**क्र. २२५१/१४४२/PSI-D/२०१८/अठरा**

# - घोषणा -

**विषय :- पोलीस उप निरीक्षक मर्यादित विभागीय स्पर्धा परीक्षा या पदासाठीच्या महिला उमेदवारांच्या शारीरिक चाचणीची सुधारित मानके**

महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत घेण्यात येणाऱ्या पोलीस उप निरीक्षक मर्यादित विभागीय स्पर्धा परीक्षा या पदासाठीच्या महिला उमेदवारांच्या शारीरिक चाचणीच्या मानकांमध्ये सुधारणा करण्याचा निर्णय आयोगाच्या विचाराधीन होता. पुरूष पोलीस शिपाई पदाच्या भरतीसाठीच्या शारीरिक चाचणीच्या मानकापेक्षा पोलीस उप निरीक्षक (स्पर्धा व विभागीय परीक्षा) यांच्या शारीरिक चाचणीची मानके किंचित शिथील केली आहेत. तथापि, महिला पोलीस शिपाई भरतीसाठीच्या शारीरिक चाचणीच्या व महिला पोलीस उप निरीक्षक मर्यादित विभागीय स्पर्धा परीक्षा यांच्यासाठीच्या शारीरिक चाचणीच्या मानकांमध्ये फरक नव्हता. ही बाब विचारात घेऊन पोलीस उप निरीक्षक मर्यादित विभागीय स्पर्धा परीक्षा (महिला) यांच्या शारीरिक चाचणीच्या मानकांबाबत शासनाशी विचार विनिमय करुन, शासनाने संमती दिल्यानुसार, पोलीस उप निरीक्षक मर्यादित विभागीय स्पर्धा परीक्षा (महिला) यांचेसाठी घेण्यात येणाऱ्या शारीरिक चाचणीची मानके अल्प प्रमाणात शिथिल करण्यात येत असून आता सुधारित मानके खालीलप्रमाणे विहित करण्याचा आयोगाने निर्णय घेतला आहे.

| **२०० मीटर धावणे** | **गुण** |
|---|---|
| ३७ सेकंद व त्यापेक्षा कमी | ४० |
| ३७ सेकंदापेक्षा जास्त-३८ सेकंदापर्यंत | ३६ |
| ३८ सेकंदापेक्षा जास्त- ३९ सेकंदापर्यंत | ३२ |
| ३९ सेकंदापेक्षा जास्त- ४० सेकंदापर्यंत | २८ |
| ४० सेकंदापेक्षा जास्त- ४१ सेकंदापर्यंत | २४ |
| ४१ सेकंदापेक्षा जास्त- ४२ सेकंदापर्यंत | २० |
| ४२ सेकंदापेक्षा जास्त- ४३ सेकंदापर्यंत | १५ |
| ४३ सेकंदापेक्षा जास्त- ४४ सेकंदापर्यंत | १० |
| ४४ सेकंदापेक्षा जास्त- ४५सेकंदापर्यंत | ०५ |
| ४५ सेकंदापेक्षा जास्त | ०० |

| **३ किलोमीटर चालणे** | **गुण** |
|---|---|
| २४ मिनिटे व त्यापेक्षा कमी | ४० |
| २४ मिनिटेपेक्षा जास्त २५ मिनिटेपर्यंत | ३५ |
| २५ मिनिटेपेक्षा जास्त २६ मिनिटेपर्यंत | ३० |
| २६ मिनिटेपेक्षा जास्त २७ मिनिटेपर्यंत | २३ |
| २७ मिनिटेपेक्षा जास्त २८ मिनिटेपर्यंत | १५ |
| २८ मिनिटेपेक्षा जास्त २९ मिनिटेपर्यंत | ०८ |
| २९ मिनिटेपेक्षा जास्त | ०० |

| **गोळा फेक (४ किलो ग्राम)** | **गुण** |
|---|---|
| ५.५० मीटर व त्यापेक्षा जास्त | २० |
| ५.०० मीटर व त्यापेक्षा जास्त — ५.५० मीटरपेक्षा कमी | १८ |
| ४.५० मीटर व त्यापेक्षा जास्त — ५.०० मीटरपेक्षा कमी | १५ |
| ४.०० मीटर व त्यापेक्षा जास्त — ४.५० मीटरपेक्षा कमी | १३ |
| ३.५० मीटर व त्यापेक्षा जास्त - ४.०० मीटरपेक्षा कमी | ०८ |
| ३.५० मीटरपेक्षा कमी | ०० |

उपरोक्त सुधारणा या पुढील घेण्यात येणाऱ्या शारीरिक चाचणी पासून लागू राहिल.

**दिनांक** : २३ एप्रिल,२०१८
**ठिकाण** : मुंबई

**सचिव**
**महाराष्ट्र लोकसेवा आयोग**